# अध्ययन – अध्यापन पद्धती व मूल्यमापन

पाठ्यक्रम आराखडा मांडणीच्या स्वरूपातच 'अध्ययन पद्धती' अध्याहृत आहे. विद्यार्थ्यांचे अनुभव, उपजत असलेली जिजीविषा यांचा मूळ आधार या अध्ययनपद्धतीस आहे. सूचक प्रश्न, सूचक प्रक्रिया व साधने आणि मूल्यमापन प्रक्रिया व साधने या तीन रकान्यांमध्ये अध्ययनपद्धती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल जागवणे; नवीन माहिती, संबोध, शोधाला दिशा देणे, आपल्या अनुभवांच्या संदर्भात स्वत:च्या नवीन संकल्पना तयार करणे, संबोधांना स्पष्ट स्वरूपात समजून घेणे, त्यांचा जीवनात उपयोग करणे या क्षमता विद्यार्थ्यांमध्ये रुजवायच्या आहेत. म्हणूनच अध्ययनअनुभवांमध्ये माहितीवजा पाठ्यांशाचे प्रमाण मर्यादित आहे. खेळ, अनुभव–कथन, चर्चा, निरीक्षण, चित्र आणि कलाविष्कार (नृत्य नाट्य), प्रसंगांची किंवा चित्रांची तुलना, कार्यानुभव (स्वत: केलेले काम), माहितीसंकलन आणि वर्गीकरण, लेखी व तोंडी नोंदी, गणित आणि अवकाशीय क्षमतांचा वापर, मोजमाप, प्रयोग, मुलाखती, तुलना इ. विविध प्रक्रियांचा आधार घेतलेला आहे. माहितीचा आधार प्रामुख्याने कुतूहल जागविणे, चर्चेला किंवा अनुभवकथनाला दिशा देणे, आपल्या अनुभवांशी जोड लावणे या दृष्टीने घेतला जाणे अपेक्षित आहे. अर्थातच नवीन माहिती आणि संबोध पाठ्यांशाचाही आधार घेणे अपेक्षित आहे. हेतू हा की केवळ माहितीवजा पाठ्यांशाचा भरणा टाळण्यात यावा. यामुळे केवळ पाठांतरावरील किंवा 'बरोबर उत्तर' देण्यावरील भर टाळता येईल.

अशा विविध मिश्र मानसिक आणि शारीरिक पद्धतींची परिसर अभ्यासाला गरज आहे. या वयोगटाच्या मुलामुलींचे साहजिक कुतूहल हे शिकण्या–शिकविण्याच्या प्रक्रियेचा पाया मानून शिक्षण हे तणावमुक्त आणि नवनिर्मितीशील व्हावे हा हेतू आहे. आपले, आपल्या कुटुंबियांचे, मित्रमैत्रिणींचे व शेजारीपाजारी यांचे अनुभव, त्यांना माहीत असलेल्या गोष्टी, करीत असलेली कामे हे सुद्धा ज्ञानाचे महत्त्वाचे स्रोत आहेत ही जाणीव शिक्षणाबद्दल आपुलकी वाढविणारी व सकारात्मक आहे. यामुळे ज्ञान हे केवळ पुस्तकांपर्यंत मर्यादित नसून ते जीवनानुभवांतून निर्माण होते व अविरत वाढत असते ही जाणीव होईल. त्यामध्ये केवळ उच्चशिक्षितांचाच नव्हे तर वंचितांचाही सहभाग असतो. पाठ्यसाहित्य, शिक्षक, समाजातील विविध घटक, निसर्ग आणि आपण सर्व मिळून नवीन ज्ञान (संबोध, क्षमता, नवीन माहिती व जाणिवा) निर्माण करू शकतो. हे कळल्यास अध्ययनातली रुची तर वाढेलच पण त्याचबरोबर शिकण्याच्या प्रक्रियेतील आपल्या सहभागाबद्दल जबाबदारीही! ज्ञाननिर्मितीतील आपल्या सहभागाची जाणीव आत्मविश्वास वाढविणारी आहे. आपण खूप शिकावे, व्यक्तिविकासाबरोबरच आपल्या शिक्षणाने समाजात बदल घडवावा, सर्वसमावेशक, न्यायपूर्ण समाजनिर्मितीसाठी आपले छोटेमोठे योगदान द्यावे ही भावना निर्माण करणे हा या अध्यापनपद्धतीचा मूळ हेतू आहे.

अशा प्रकारच्या शोधाची वाटचाल योग्य दिशेने आणि समाधानकारकरीत्या होत आहे की नाही हे पाहण्यासाठी मूल्यमापन प्रक्रिया आणि साधने निश्चित करणे आवश्यक आहे.

### मूल्यमापन

विद्यार्थ्यांमधील बदल समजून घेणे म्हणजेच मूल्यमापन. हे मूल्यमापन सातत्यपूर्ण आणि सर्वंकष असे होण्यासाठी आकारिक आणि संकलित असे दोन्ही पद्धतींनी होणे गरजेचे आहे. म्हणूनच या अभ्यासक्रम आराखड्यात मूल्यमापनाची प्रक्रिया व त्यासाठी विविध साधन तंत्रे सुचविलेली आहेत. उद्दिष्टपूर्ती म्हणजे केवळ माहिती पाठ

करून लिहून काढणे असे नसून वैचारिक, भावनिक प्रक्रियांना विशिष्ट दिशा मिळावी, त्यांचा विकास व्हावा ही मानली गेली आहे. 'अध्ययनदर्शक' ह्या रकान्यामध्ये केवळ त्या पातळीला विद्यार्थी 'काय करतात' ह्याचे विवरण नसून विद्यार्थ्यांमधील अपेक्षित बदल विधान स्वरूपात मांडले आहेत. विद्यार्थ्यांमधील बदल ही प्रक्रिया आहे. तत्कालीन साध्य नव्हे, हेही येथे लक्षात ठेवणे अगत्याचे आहे.

विद्यार्थ्यांचे ज्ञानरचनेतील महत्त्वाचे स्थान लक्षात घेता त्यांच्यात झालेले, होत असलेले आणि होऊ शकणारे बदल ह्या तीनही परिमाणांचा विचार करणारे अध्ययनदर्शक निश्चित केले आहेत. ह्या सर्व प्रक्रियेमध्ये मूळ हेतू विद्यार्थ्यांवरील केवळ अनाकलनीय माहितीच्या ओझ्याचा भार हलका करण्याबरोबरच मूल्यमापनाची म्हणजेच परीक्षेची भीती कमी करणे आहे. हसतखेळत शिकणे साध्य व्हावे म्हणून मूल्यमापनही हसतखेळत होणे गरजेचे आहे.

मूल्यमापन किंवा परीक्षण हा शिक्षणव्यवस्थेचा अंगभूत घटक आहे. विद्यार्थी खरोखरच काही शिकले का? शिक्षकांना अध्यापनाची उद्दिष्टे साध्य करता आली का? विद्यार्थ्यांना जे शिक्षण मिळाले ते त्यांच्या दृष्टीने उपयुक्त होते का? या प्रश्नांची उत्तरे मूल्यमापनातूनच स्पष्ट होऊ शकतात. पण केवळ लेखी परीक्षा म्हणजे मूल्यमापन नाही ही जाणीव आजच्या समाजात हळूहळू मूळ धरत आहे. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ कलम २९(१) व (२) मुळे प्राथमिक इयत्तांतील (इयत्ता पहिली ते आठवी) विद्यार्थ्यांवर 'नापास'चा शिक्का लागू नये ही तरतूद केली आहे. याचा अर्थ हा नव्हे की विद्यार्थी केवळ एका वर्गातून दुसऱ्या वर्गात तांत्रिक प्रवेश घेतील. त्यांच्या वय व इयत्तांनुसार ज्ञान, क्षमता, विचारपद्धती, मूल्ये इत्यादीबाबतीत सकारात्मक बदल होणे अपेक्षितच नाही तर बंधनकारक आहे. २००९ च्या कायद्यानुसार 'गुणवत्तापूर्ण तणावरहित शिक्षण' हा ६ ते १४ वयोगटातील बालकांचा अधिकार आहे. मूल्यमापन प्रक्रिया शिकण्याला पोषक व सकारात्मक होणे हे केवळ काही टप्प्यांवर आणि लेखी किंवा पाठ केलेल्या माहितीवर अवलंबून नसावे तर सातत्यपूर्ण सर्वंकष व गुणवत्तापूर्ण असावे ही अपेक्षा आहे. यामध्ये प्रश्नपत्रिकांचे स्वरूप बदलणे, त्यांची अनावश्यक लांबी कमी करणे, केवळ स्मरणशक्तीवर भर देणाऱ्या प्रश्नांऐवजी विविध उपक्रमांद्वारे मूल्यमापन करणे, पुस्तकी माहितीची उजळणी करणारे, ठरीव छापाचे प्रश्न न विचारता ग्रहण केलेल्या माहितीचा, ज्ञानाचा वास्तव जीवनात कुठे आणि कसा वापर करायचा यासंबंधीच्या विचारांना चालना देणाऱ्या मूल्यमापन पद्धतीचा अंतर्भाव करणे इ. उपाय योजावे लागतील. याद्वारे विद्यार्थी आणि शिक्षकांमधील अध्ययन–अध्यापनप्रक्रियेत सृजनात्मकता जागृत होईल.

या सर्व गोष्टींचा विचार करून अभ्यासक्रमात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीचा समावेश करण्यात आला आहे. त्यासाठी वापरावयाची साधन तंत्रे अंतर्भूत केलेली असून पुढील अध्ययनदर्शकांचाही समावेश करण्यात आला आहे.

### अध्ययनदर्शक

१. **निरीक्षण आणि मांडणी :** निरीक्षण करणे, मांडणी व वर्गीकरण करणे, सादरीकरण करणे.

२. **संयोजन :** विषयानुसार मुद्देसूद वर्गीकरण करणे, तुलना करणे, फरक व साम्य स्पष्ट करणे.

३. **पृथक्करण :** अनुमान लावणे, गृहीतक मांडू शकणे, अनुमानाच्या मदतीने उत्तर शोधणे.

४. **चर्चा :** लक्षपूर्वक ऐकणे, समजून घेणे, मौखिक सादरीकरण, विचार व मते व्यक्त करू शकणे, इतरांचे विचार समजून घेण्यासाठी त्यांच्याबरोबर चर्चा करणे.

५. **अभिव्यक्ती** : चित्र काढणे, शारीरिक हालचाली, लेखन, मातीकाम, गाणी, नृत्य इ. अभिरुची.

६. **स्पष्टीकरण :** कारणमीमांसा व विश्लेषण.

७. **प्रश्न विचारणे/चिकित्सा :** कुतूहलात्मक प्रश्न विचारणे, नवीन प्रश्न तयार करू शकणे. विश्लेषक विचार करणे.

८. **प्रयोगशीलता :** प्रयोग करणे, पृथक्करण करणे, वर्गीकरण करणे, नवीन पद्धती वापरणे.

९. **न्याय व समानता :** वंचित घटक, स्त्रिया, वृद्ध, शारीरिक व मानसिक दुर्बलांबद्दल आत्मीयता व आदर.

१०. **सहकार्य आणि जबाबदारी :** इतरांबरोबर मिळून मिसळून काम करू शकणे. सामुहिक जबाबदारी समजून घेणे व ती पार पाडणे.

११. **नैसर्गिक पर्यावरणाबद्दल संवेदनशीलता :** निसर्गातील सजीव व अजीव सृष्टीबद्दल संवेदना. त्यांची जोपासना करणे.

१२. **सहकार**

मूल्यमापनाचा महत्त्वाचा हेतू विद्यार्थ्यांची प्रतवारी करणे हा नसून शिकण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या समस्यांचे वेळीच निदान करून विद्यार्थ्यांमधील कौशल्यांचे संवर्धन करता येईल असे साधन शिक्षकांना उपलब्ध करून देणे हा आहे. लेखी कामाबरोबर वेगवेगळ्या पद्धतीचे तोंडीकाम (केवळ प्रश्नोत्तरवजा नव्हे तर गाणी, गोष्टी, अनुभवकथन इ.) कला आणि गटकार्य यांचाही समावेश करणे अपेक्षित आहे.

शिक्षणाची उद्दिष्टे आणि परिसर अभ्यास या विषयाची उद्दिष्टे यांची पूर्ती होत आहे का....हा मूल्यमापनाचे मूळ आधार असणे आवश्यक आहे. शांती, समानता, सामाजिक न्याय, पर्यावरणसंवर्धन आणि शाश्वत विकास ही उद्दिष्टे गाठण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये अनुरूप, अपेक्षित बदल होत आहेत का? निर्णयक्षमता, संवेदनशीलता, चिकित्सक वृत्ती त्यांच्यात जोपासली जात आहे का? हे निश्चित करणे गरजेचे आहे.

◈◈◈